"प्रयत्न" हा मराठी लघुचित्रपट राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांना दाखविण्यास परवानगी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२३/प्र.क्र.४८/प्रशिक्षण
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
तारीख: २४ नोव्हेंबर, २०२३

वाचा

१. श्री.अमर विक्रम घाटे, आर्ट फॅक्टरी एंटरटेनमेंट, पुणे, यांचे दि. २८.०६.२०२३ व १६.१०.२०२३ चे निवेदन
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग पत्र क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.२५/प्रशिक्षण, दि.०५.०३.२०२०
३. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र. पुणे यांचे पत्र क्र.जा.क्र.राशैसंवप्रपम/प्रमा/प्रयत्न लघुचित्रपटअहवाल/२०२३-२४/४८६१ दि.१३.१०.२०२३

शासन निर्णय:-

श्री.अमर विक्रम घाटे, आर्ट फॅक्टरी एंटरटेनमेंट, पुणे यांनी "प्रयत्न" हा मराठी लघुचित्रपट राज्यातील शाळांमधून दाखविण्यास परवानगी देण्याची संदर्भाधीन दिनांक २८/०६/२०२३ च्या पत्रान्वये विनंती केली आहे. त्यानुसार संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये नमूद कार्यवाहीकरिता गठीत परिक्षण समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे.

अभ्यासात रस नसलेल्या आणि खोडकरपणा करणाऱ्या विद्यार्थ्याला शिक्षक त्याच्या घरची परिस्थिती समजावून घेवून, अभ्यासाचे वेगवेगळी अवघड कामे (टास्क) देऊन अभ्यासाच्या प्रवाह आणतात आणि अभ्यासाची गोडी वाढवतात तसेच प्रयत्न करणाऱ्यांपुढे नशिब सुध्दा हरते तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासात शिक्षकांबरोबर पालकांचीही तितकीच जबाबदारी आहे हे या लघुचित्रपटात दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. लघुचित्रपटात जोडलेल्या मुलाखतीवरुन विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे अभ्यास केला तर अधिकारी, वकिल, डॉक्टर होता येते ही प्रेरणा मिळणार आहे. आत्मविश्वास आणि अभ्यासाची आवड निर्माण करण्यासाठी "प्रयत्न" हा लघुचित्रपट राज्यातील शाळांमधील विद्यार्थी/विद्यार्थिनींना दाखविण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष सन २०२३-२४, २०२४-२५ करिता परवानगी देण्यात येत आहे.

अटी:-

१) "प्रयत्न" हा लघुचित्रपट राज्यातील शाळांमधील फक्त १० वर्ष वयोगटापुढील विद्यार्थ्यांना दाखविण्यास परवानगी देण्यात येत आहे .
२) सदर लघुचित्रपट पाहण्याची कोणत्याही विद्यार्थ्यांना सक्ती करण्यात येणार नाही.

३) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमात कोणताही अडथळा येणार नाही याची योग्य ती दक्षता घेण्यात यावी.

४) या शासन परवानगीच्या आधारे सदर लघुचित्रपट दाखविण्याबाबत इतर दुसऱ्या कोणत्याही संस्थेबरोबर श्री.अमर विक्रम घाटे, आर्ट फॅक्टरी एंटरटेनमेंट, पुणे यांना करार करता येणार नाही किंवा प्रतिनिधी नेमता येणार नाही व तशी परवानगी त्यांना राहणार नाही.

५) सदरहू लघुचित्रपट पहाण्यास इच्छुक विद्यार्थ्यांकडून रुपये २०/- (रुपये वीस फक्त) पेक्षा जास्त शुल्क आकारता येणार नाही.

६) हा लघुचित्रपट शाळांमधून दाखविताना कोणत्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास किंवा तक्रारी प्राप्त झाल्यास सदर संस्थेस दिलेली परवानगी तात्काळ रद्द करण्यात येईल.

७) सदर लघुचित्रपट दाखविण्याची परवानगी शैक्षणिक वर्ष २०२३-२४, २०२४-२५ पुरतीच मर्यादित राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेताक २०२३११२४१४३८४०२३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHEETAL BAJIRAO PATIL

Digitally signed by SHEETAL BAJIRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=6adeda15802b25aea33a6c776475fa0e7bf7705ff3cfb01e460cd55351e58270, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6BDBFE7A78900AD71C27AF6074AFF455E2E529BC5573C2D2CC1BBFC69F0E7579, cn=SHEETAL BAJIRAO PATIL
Date: 2023.11.24 14:38:36 +05'30'

(शितल पाटील)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. शिक्षण संचालक, (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, पुणे.
६. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
७. विभागीय शिक्षण उप संचालक (मुंबई/पुणे/कोल्हापूर/नाशिक/ औरंगाबाद/ लातूर/अमरावती/ नागपूर.
८. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, शिक्षण निरीक्षक, उत्तर / दक्षिण / पश्चिम मुंबई
९. श्री.अमर विक्रम घाटे, आर्ट फॅक्टरी एंटरटेनमेंट, १८, राजगड सोसायटी, रामबाग कॉलनी, पौड रोड कोथरुड, पुणे ४११०३८.
१०. निवड नस्ती (प्रशिक्षण)